पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट क्रमांक -३५६ दिनांक -१३/०५/२०२३

### खडकी पोलीस स्टेशन,पुणे शहर

### टोळी प्रमुख नादर चंगेज इराणी व त्याचे इतर १२ साथिदार यांचे विरूध्द मकोका कारवाई.

दिनांक २१/०४/२०२३ रोजी ईराणी वस्ती, पाटील ईस्टेट,शिवाजीनगर पुणे येथे फिर्यादी व फिर्यादी यांची आई,भाऊ असे फिर्यादी यांचे आईच्या घरी इराणी वस्तीतुन जात असताना वस्तीतील महमंद शौकत शेख, जैनब फिदा इराणी, सोगरा, व फिरदोस, रुक्सार व नादर इराणी, शब्बीर इराणी, हैदर शेख, कासिम अबालु इराणी, मेहंदी हसन कंबर इराणी, फिदा इराणी व इतर ०८ ते १० लोक असे हातात लोखंडी हत्यार, हॉकी स्टीक लोखंडी गज काचेच्या बाटल्या, दगड असे घेवुन येवुन फिर्यादीस शिवीगाळ करुन त्यांना जिवे ठार मारण्याचे उद्देशाने मारहाण करुन खाली पाडुन फिर्यादीचे भावास तलवारीने वार करीत असताना तो वार फिर्यादीने स्वताचे डावे हाताने अडविला त्यावेळी फिर्यादीस गंभीर जखमी करुन त्याचे वस्ती मधील इतर इसम यांचे डोक्यात घातक शस्त्राने मारहाण करुन गंभीर जखमी करुन वस्ती मध्ये घरांवर काचेच्या बाटल्या, दगड फेकुन हातात तलवारी घेवुन दहशत करुन फिर्यादीचा भाऊ यांस तलवारीने जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे म्हणुन

त्याबाबत खडकी पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर १२४/२०२३ भादविक ३०७,३२४,३२३,५०४,१४३ १४७, १४८,१४९,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)१३५ सह क्रिमिनल लॉ अमेंडमेंट अँक्ट कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

यातील गुन्ह्याच्या तपासा दरम्यान निषन्न झालेले आरोपी **१)जमीर कंबर इराणी वय २३ रा.पाटकर प्लॉट.महात्मा गांधी वसाहत इराणी वस्ती शिवाजीनगर पुणे.२)कासीम आबालु इराणी वय २३रा.सदर ३)मोहमद्द शौकत शेख वय ३० रा.सदर ४)मेहंदीहसन कंबर इराणी वय २१ रा सदर ५)जैनब फिदा इराणी वय २१ रा.सदर ६)शहजादी उर्फ मुथडी जावेज इराणी वय ४३ रा.सदर ७) सोगरा उर्फ नरगिस सामीर इराणी वय २४ रा.सदर** यांना अटक करण्यात आली असुन इतर ५ आरोपीचा शोध चालू आहे.

गुन्ह्याच्या तपासा मध्ये आरोपी नादर चंगेज इराणी, (टोळी प्रमुख) याने त्याचेसह अन्य सदस्यांसाठी आपले अधिपत्याखाली प्रत्येक गुन्ह्यात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेऊन स्वतःची संघटीत टोळी करून गुन्हे केलेले असुन त्यांनी अवैध मार्गाने अर्थिक फायदा मिळवण्याच्या उद्देशाने जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे,गंभीर दुखापत करणे,जबरी चोरी करणे,नागरीकांच्या मालमत्तेच तोडफोड करुन नुकसान करणे,सर्वसामान्य नागरीकांच्या मध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करणे, बेकायदेशीर शस्त्र जवळ बाळगणे ,पोलिसांच्या आदेशाचा भंग करणे,बेकादेशीर जमाव जमविणे या सारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे वांरवार केले आहेत यातील आरोपी यांनी संघटीत पणे दहशतीच्या मार्गाने स्वताच्या अर्थिक फायदया करीता सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने प्रस्तुत गुन्ह्यास महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३(१)(ii)३(२),३(४) चा अंतर्भाव करणे कामी खडकी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विष्णु ताम्हाणे यांनी मा.पोलीस उप आयुक्त, परि-४, पुणे शहर श्री. शशिकांत बोराटे,यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री. रंजनकुमार शर्मा यांना सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन वरील टोळी विरुध्द खडकी पोलीस स्टेशन येथे गु.नं.१२४ /२०२३ भा.द.वि.कलम. ३०७,३२४,३२३,५०४,१४३,१४७,१४८,१४९, फौजदारी सुधारणा कायदा सन २०१३ चे कलम ७, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)३ सह १३५ अन्वये दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३(१)(ii)३(२),३(४)चा अंतर्भाव करण्याची मा. अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री. रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,खडकी विभाग पुणे शहर श्रीमती आरती बनसोडे ह्या करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री. रितेश कुमार, मा. पोलीस सह आयुक्त श्री. संदिप कर्णिक, मा. अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री. रंजनकुमार शर्मा, मा. शशिकांत बोराटे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, खडकी विभाग, पुणे शहर श्रीमती आरती बनसोडे, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर,श्री. विष्णु ताम्हाणे, ,पोलीस निरीक्षक (गुन्हे)श्री. मानसिंग पाटील पोलीस उप निरीक्षक वैभव मगदूम पोलीस अंमलदार राजकिरण पवार,रमेश जाधव यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री. रितेश कुमार यांनी कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवुन शरिराविरुध्दचे व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन, गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. त्यांचे मार्गदर्शनाखाली **मोक्का अंतर्गत केलेली ही २४ कारवाई आहे.**